पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भूमि आणि जिंदगी विभाग ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी-३४

## जाहीर नोटीस

पिंपरी चिंचवड महानरपालिकेचे **दापोडी स.न. १२ पै १३ पै मधील आरक्षण क्र. ३/१३ वाहनतळ क्षेत्रफळ ८८४२.०० चौ.मी.** वाहनतळ जागा ११ महीने कालावधीकरीना भाडेतत्वावर देणेसाठी इच्छुक मंस्था, व्यक्ती/नागरीक यांचेकडून मागणी अर्ज मागविणेत येत आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकीय दर रक्कम रुपये (११महीनेकरीता) | ११ महीने भाडे रकमेवरील जी.एस.टी. १८% | अनामत र.रु. | वाहनतळ जागेचे क्षेत्र चौ.मि. | भाडेपट्टा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | दापोडी स.न. १२ पै १३ पै मधील आरक्षण क्र. ३/१३ वाहनतळ जागा ११ महीने कालावधीकरीता भाडेतत्वावर देणे | र.रु. ८०,६१,३२८/- | र.रु १४,५१०,३९/- | जाहीर केलेल्या मासिक भाडेरक्कमेनुसार ३ महीन्याचे आगाऊ भाडे | ८८४२.०० चौ.मी.) | ११ महीने |

सदर जाहीर नोटीसमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या मिळकतीचा सविस्तर तपशील, नियम अटी, शर्ती व माहीती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर व ह क्षेत्रीय कार्यालय कासारवाडी-३४ येथे भूमि जिंदगी टेबलकडे उपलब्ध होईल. याकामी मनपाच्या 'ह' क्षेत्रीय कार्यालयात इच्छुकांनी मा. क्षेत्रीय अधिकारी ह क्षेत्रीय कार्यालय कासारवाडी-३४ यांचे नावाने मागणी अर्ज करणे आवश्यक आहे. सदरचे अर्जावर महीना कालावधीनंतर पुढील दिनांक निश्चित करुन आपणास ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये बोलावून घेऊन सर्वासमोर जाहीर लिलाव पद्धतीने जो जास्त बोली बोलेल त्या रकमेनुसार त्यांना ११ महीने कालावधीकरीताच्या मनपा नियमानुसार वाहनतळ भाडेतत्वावर वितरीत करण्यात येईल.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
१७/०३/२५

क्षेत्रीय अधिकारी
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी-३४

ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी
हक्षेका/भूजि /५/कावि/ ७९ /२०२५
दिनांक १७ /०३/२०२५

प्रत,
१.नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकामी
२. संगणक चालक
२/- मनपा वेब साईडवर प्रसिध्द करणेकामी.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८**

**भूमि आणि जिंदगी विभाग ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी-३४**

**मौजे दापोडी स.न. १२ पै १३ पै मधील आरक्षण क्र. ३/१३ वाहनतळ क्षेत्रफळ ८८४२.०० चौ.मी. वाहनतळ जागा ११ महाने करीता भाडेतत्वावर देणेबाबत..**

**अटी व शर्ती –**

१)प्रस्तुत पर्यायी वाहनतळ जागेसाठी ११ महिने कालावधीकरीता सदरकामी प्राप्त अर्जदारांपैकी जो अर्जदार मनपाने जाहीर केलेल्या दरापेक्षा सर्वात जास्त भाडेदर देणेस तयार असेल त्या अर्जदारास सदर वाहनतळ ठेक्याने देणेबाबत पुढील नियमाधीन कार्यवाही करणेत येईल. तसेच त्याने काही कारणास्तव ठेका घेण्यास नकार दर्शविल्यास सदर प्रक्रीया नव्याने राबवण्यात येईल.

२)एका अर्जदारारास एकच अर्ज करणे अनिवर्य आहे. त्यासोबत आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता करावी लागेल.

३)अर्जदाराने अर्जासोबत पँन कार्ड, रहीवासी पुरावा, आधारकार्ड, पोलीस चरीत्रपडताळणी प्रमाणपत्र इत्या. कागदपत्रे सत्यप्रत करुन जोडणे आवश्यक आहे. अपुर्ण कागदपत्रे असल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल.

४)सदर वाहनतळ जागा हि ११महीने कालावधीकरीता देण्यात येणार असल्याने कोणत्याही प्रकारच्या इतर सोई सुविधा देण्यात आलेल्या नाहीत या ठिकाणी अर्जदाराने आवश्यक त्या सोयी सुविधा स्वखर्चाने करावयाच्या आहेत. वाहनतळ जागेची समक्ष पाहणी करुन वाहनतळ जसे आहे तसे त्या स्थितीत भाडेने घ्यावे लागेल. कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५)ठेकेदाराने वाहनांवरील फी वसूली करताना द्यायावयाच्या पावतीचा नमुना क्षेत्रीय कार्यालयाकडून तपासून घ्यावा लागेल. त्यानमुन्यानुसार संबंधित ठेकेदाराने पावती देणे बंधनकारक राहील.

६)सदर वाहनतळासाठी भाडेदर देताना एकुण ११ महीने कालावधीसाठीचा एकुण भाडेदर अर्जदाराने नमूद करावा. त्याव्यतिरिक्त त्यावरील शासकीय व इतर लागू होणारे कर अर्जदारास भरावे लागतील

७)अर्जदारास वाहनतळ ११ महिन्याचे एकुण भाडे रक्कम रुपये एकरक्कमी भरावे लागतील याची नोंद घ्यावी.

८)११ महीने रजिस्टर भाडेकरारासाठी येणारा खर्च, स्टँपपेपर, मसुदा खर्च, रजिस्टरेशन फी,इत्यादी खर्च ठेकेदाराने स्वत: करावयाचा आहे

९)सदर वाहनतळ ठेक्यास जर मुदवाढ दयावयाची झालेस व त्याप्रमाणे संबंधित ठेकेदाराने वाहनतळची मागणी केलेस सदरकामी मंजूर करणेत आलेल्या पुर्वीच्या भाडेदरावर १२.५% वाढ करणेत येईल व त्याप्रमाणे भाडेदर आकारणेत येईल. मुदतवाढीबाबतचा अंतिम निर्णय हा क्षेत्रीय अधिकारी यांचा राहील.

१०)सदरकामी भरणेत आलेली अनामत रक्कम सदर ठेक्याचा/कामाचा कालावधी संपलेनंतर संबंधितास मागणीनुसार परत करणेत येईल.

११) वाहनतळ जागा सकाळी ८.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत सुरु ठेवली पाहीजे व त्याठिकाणी ठेकेदाराने स्वत:चे कर्मचारी नेमले पाहीजे.

१२)सदर वाहनतळाचा ठेका विहीत कार्यपध्दतीने मान्य झालेनंतर मंजूर ठेक्याची रक्कम पिंपरी चिंचवड मनपामार्फत संबंधित ठेकेदारास कळविणेत येईल. त्यानंतर प्रथमत: ठेकेदाराने सदर ठेक्याची होणारी एकुण भाडे रक्कम आगाऊ स्वरुपात त्वरीत भरावयाची आहे. सदर रक्कम भरून रजिस्ट करारनामा करुन घेण्यात आल्यानंतर सदर वाहनतळ ताब्यात देणेत येईल.

१३)वाहन पार्किंग जागेत ठेकेदारांने स्वत: इतर कर्मचा-यासह समक्ष हजर राहीले पाहीजे. अगर जबाबदार कर्मचा-यास त्या ठिकाणी हजर ठेवले पाहीजे. आणि त्यांनी ठेकेदाराच्या जागी जबाबदारीने सर्व व्यवस्था पाहीली पाहीजे. कर्मचा-यांना ओळखपत्र गणवेश देण्यात यावा.

१४) नेमून दिलेल्या वाहनतळ जागेचा मिळकतकर भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

१५) वाहनतळामध्ये विज कनेक्शन घेणे,पाणी कनेक्शन व इतर आवश्यक परवाने घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१६) सदर वाहनतळ वितरीत करण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मनपास राहील.

१७) कराराने दिलेल्या मनपा वाहनतळाची तपासणी करण्याचे अधिकार मनपा कर्मचारी व अधिकारी यांना राहील.

१८) पर्यायी वाहनतळ फक्त दुचाकी वाहने पार्किंग करीता असल्याने पार्किंगसाठी येणा-या दुचाकी वाहनावर फी वसूलीचे दर खालीलप्रमाणे राहतील.

अ) दुचाकी वाहनाकरीता पहिल्या एक तासापर्यंत र.रु २/-

१ तासाच्या पुढील कालावधीकरीता र.रु.३/- प्रती तास

मासिक पास शुल्क र.रु १५०/-

१९) निर्धारित शुल्काचे दरपत्रक वाहनतळाच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

२०) सरकारी/निमसरकारी/शासकीय वाहन या शासकीय मालमत्तेच्या वाहनाकडून पे अँन्ड पार्कचे भाडे घेऊ नये. परंतु शासकिय संस्थेने भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांकडून नियामानुसार पार्किंग फी घ्यावी.

२१)सदर जागा मनपास आवश्यक वाटेल त्यावेळी मनपाच्या ताब्यात घेण्यात येईल. व सदरचा करारनामा त्याच वेळी समाप्त झाला असे समजण्यात येईल याची नोंद अर्जदाराने घ्यावी.

२२)वाहनतळाकरीता नेमलेल्या कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी भरण्याची जवाबदारी ही संबंधित ठेकेदाराची राहील.

२३) वाहनतळामध्ये बालकामगार नेमता येणार नाहीत. तसेच नेमलेल्या कर्मचा-यांना म.न.पा. सेवेकरीता हक्क सांगता येणार नाही.

२४)आपतकालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णवाहीका, अग्निशामक वाहन सदर वाहनतळामधून व्यवस्थितरित्या मार्गक्रमण होईल याची दक्षता घ्यावी लागेल.

२५) वेळोवेळी शासनाकडून/मनपाकडून देण्यात येणा-या सूचना व आदेशांचे पालन करणे वाहनतळ चालविणा-या ठेकेदारावर बंधनकारक राहील.

क्षेत्रीय अधिकारी
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी-३४